# मेट्रो ३ च्या कामावर मुख्यमंत्री समाधानी

## उद्धव ठाकरेंकडून सहार रोड स्थानकाची पाहणी : सहार रोड स्थानकाच्या भुयारीकरणाचे ४८ टक्के काम पूर्ण



**मुंबई :** मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शनिवारी कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो ३ च्या कामाची पाहणी केली. यावेळी मुंबई उपनगरचे पालकमंत्री आदित्य ठाकरे, परिवहन मंत्री अनिल परब आणि मेट्रोचे अधिकारी उपस्थित होते.

**मुंबई :** मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शनिवारी कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो ३ च्या कामाची पाहणी केली. यावेळी ठाकरे यांनी मेट्रोच्या कामाबाबत समाधान व्यक्त करताना अधिकाऱ्यांना काही सूचना केल्या.

मेट्रो ३ च्या प्रकल्पाचे काम सध्या वेगात सुरू आहे. प्रकल्पाच्या सद्यस्थितीबाबत ठाकरे यांनी समाधान व्यक्त करताना एमएमआरडीएचे अधिकारी तसेच अभियंत्यांकडून कामाचा आढावा घेतला. यावेळी ठाकरे यांनी मेट्रो मार्गासाठी खोदलेल्या मोठ्या बोगद्यात फिरून कामाची पाहणी केली.

सहार रोड स्थानकाचे भुयारीकरण ४८ टक्के पूर्ण झाले असून पॅकेज ६ चे काम ५० टक्के पूर्ण झाले आहे. सहार रोड स्थानकाची लांबी २१८ मीटर असून रुंदी ३० मीटर आहे. मेट्रो मार्गिकेच्या ट्रॅकचे आंतरबदल (इंटर चेंज) व्हावे यासाठी सहार रोड ते छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ (सीएसएमआयए) स्थानकाच्या दरम्यान भूमिगत सीझर क्रॉस ओव्हर बांधण्यात येत आहे. याचे बांधकाम न्यू ऑस्ट्रियन टनेलिंग पद्धतीने केले जात आहे. पॅकेज ६ चे एकूण ५९ टक्के काम तर ७३ टक्के भुयारीकरण पूर्ण झाल्याची माहिती यावेळी अधिकाऱ्यांकडून देण्यात आली.